N.C.R.B (एन.सी.आर.बी)
I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT

(Under Section 173 B.N.S.S)
प्रथम खबर अहवाल
(कलम बी एन एस एस १७३ च्या अंतर्गत)

1. **District (जिल्हा):** अमरावती शहर **P.S.(ठाणे):** राजापेठ

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0056 **Year (वर्ष):** 2025

**Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 05/02/2025 02:44

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |
| 2 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7A |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** मंगलवार **Date From (दिनांक पासून):** 04/02/2025
**Time Period (कालावधी):** पहर 6 **Date To ( दिनांक पर्यंत):** 04/02/2025
**Time From (वेळेपासून):** 16:08 बजे
**Time To (वेळेपर्यंत):** 16:29 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**
**Date (दिनांक ):** 05/02/2025 **Time (वेळ):** 02:00 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**
**Entry No. (नोंद क्र.):** 008
**Date & Time (दिनांक आणि वेळ):** 05/02/2025 02:44 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**
दक्षिण, 4 किमी **Beat No. (बिट क्र.):**

(b) **Address (पत्ता):** MIDC प्रादेशिक कार्यालय ,अमरावती

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**
**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**
**District(State) (जिल्हा(राज्य)):**

सत्यप्रत
Jadhav
भारत एकनाथ जाधव
पोलीस निरीक्षक
ॲन्टी करप्शन ब्युरो,अमरावती.



Scanned with ACE Scanner

**6. Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

(a) **Name (नाव):** आकाश नथ्थुजी ठाकरे
(b) **Father's/Husband's Name(वडील / पती चे नाव) :**
(c) **Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 1995
(d) **Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत
(e) **UID No. (यु.आय.डी. क्र.):**
(f) **Passport No.(पारपत्र क्र.):**
**Date of Issue (दिल्याची तारीख):**
**Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**
(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN)** ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address (पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | व्यंकटेष कॉलनी,वडाळी नाका, अमरावती, ,अमरावती शहर,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | व्यंकटेष कॉलनी,वडाळी नाका, अमरावती, ,अमरावती शहर,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation (व्यवसाय):**
(j) **Phone number (फोन नं.):**
**Mobile (मोबाइल नं.):** 91-8208462072

**7. Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | मोतीराम माणिकराव ढोरे | | | 1. एमआयडीसी कॉलनी,रूम नं 102,,शहनाई मंगल कार्यालयाचे मागे, ,बडनेरा रोड, अमरावती,अमरावती शहर, महाराष्ट्र,भारत |

**8. Reasons for delay in reporting by the complainant/informant (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):**

**9. Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|



Scanned with ACE Scanner

10 **Total value of property (In Rs/-)**
**(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**

11.**Inquest Report / U.D. case No., If any**
**(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

12.**First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**
अप. क्र. व कलम- 56 /2025 कलम 7, 7A भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम 1988.
फिर्यादीचे नांव व पत्ता -आकाश नथ्थुजी ठाकरे, वय 30 वर्ष , व्यवसाय पोल्ट्री फॉर्म, राह. व्यंकटेष कॉलनी, वडाळी नाका, अमरावती, जि. अमरावती. मो.नं. 8208462072.
आरोपी - मोतीराम माणिकराव ढोरे, वय 42 वर्ष, पद सहाय्यक, वर्ग-3, महाराष्ट्र राज्य औदयोगिक विकास महामंडळ कार्यालय, बडनेरा रोड, अमरावती, राह. एमआयडीसी कॉलनी, रूम नं. 102, शहनाई मंगल कार्यालयाचे मागे, बडनेरा रोड, अमरावती
गुन्हा घडल्याचे ठिकाण -MIDC प्रादेशिक कार्यालय अमरावती
गुन्हा घडला दिनांक व वेळ -दि.04/02/2025 चे 16.08 वा. ते 16.29 वा. दरम्यान
दाखल ता. वेळ – दि. 5/02/25 चे
दाखल अधिकारी - पोलीस उपनिरीक्षक ए.एस.बकतवार पो. स्टे. राजापेठ अमरावती
नक्कल लेखी फिर्याद – फिर्याद दिनांक: 05/02/2025 माझे नाव:- आकाश नथ्थुजी ठाकरे, वय 30 वर्ष , व्यवसाय पोल्ट्री फॉर्म, राह. व्यंकटेष कॉलनी, वडाळी नाका, अमरावती, जि. अमरावती. मो.नं. 8208462072. मी समक्ष दिनांक 31/01/2025 रोजी ला.प्र.वि. कार्यालय, अमरावती येथे येवुन तक्रार दिली होती की, मी वरिल ठिकाणी पत्नीसह राहत असुन चांदुर रेल्वे येथे माझा स्वतःचा पोल्ट्री फॉर्मचा व्यवसाय आहे, त्यावर माझे कुटुंबाचा उदरनिर्वाह चालतो. माझे आई वडील हे सध्या माझी विवाहीत बहिण सौ. किर्ती हिच्याकडे पुणे येथे वास्तव्यास असुन माझे वडीलांना तोंडाचा कॅन्सर असल्याने पुणे येथील दिनानाथ हॉस्पिटलमध्ये त्यांचेवर उपचार सुरू आहे. माझे वडील जिल्हा परिषद, अमरावती येथून सार्वजनिक बांधकाम विभागातुन डिसेंबर 2020 मध्ये सेवानिवृत्त झालेले आहेत. सन 2019 मध्ये माझी बहिण किर्ती हिचे नावे एमआयडीसी अमरावतीचे मार्फतीने नांदगाव पेठ येथे टीएस 12 क्रमांकाचा प्लॉट खरेदी केला होता. त्याकरीता आमचेकडील काही बचतीची रक्कम, काही रक्कम सोने तारण ठेवून कर्ज घेतले व काही वडीलांच्या फंडातुन घेवून एकुण 13,00,000/-रू. (अक्षरी तेरा लाख रूपये) असे एमआयडीसीला भरले होते. त्यांनतर करारनाम्याने सदरचा प्लॉट माझी बहिण किर्ती नथ्थुजी ठाकरे हिच्या नावावर खरेदी केला होता. त्यांनतर तिचा विवाह झाल्याने ती पुणे येथे स्थायिक झाली आहे. माझी बहिण पुणे येथे असल्याने व माझ्या वडीलांचे उपचारही पुणे येथे चालु असल्याने बहिणीला वारंवार अमरावती येथे येणे षक्य होत नाही, त्याकरीता तिचे सर्व व्यवहार तिच्या तोंडी सहमतीने मीच पाहत असतो. सन 2023 मध्ये माझ्या वडीलांना तोंडाचा कॅन्सर झाल्याने आम्ही त्यांचे प्रथम अमरावती येथे उपचार केले, त्यांनतर पुणे येथे दिनानाथ हॉस्पिटल येथे उपचार सुरू केले आहेत. त्या उपचारामध्ये बरेच पैसे खर्च झाले असुन अजुनही खुप पैसे लागणार आहेत. त्यामुळे आम्ही विचाराअंती नांदगाव पेठ येथे एमआयडीसी, अमरावतीचे मार्फतीने खरेदी केलेला प्लॉट क्रमांक टी.एस. 12 सरेंडर करण्याचे ठरवले. त्याप्रमाणे मी एमआयडीसी अमरावती येथे सदरची प्लॉट टी.एस. 12 सरेंडर करण्याबाबत माहिती घेवून जुलै 2024 मध्ये सदरचा प्लॉट परत करण्याची प्रक्रिया पूर्ण करून सदर प्लाटचे ओरिजनल करारनामा व इतर कागदपत्रे सादर केले. त्यावेळी एमआयडीसी अमरावती कार्यालयातील संबंधीत विभागाचे श्री. ढोरे साहेबांनी मागील पाच वर्षाचा टॅक्स कापून एकुण 9,30,000/-रू. (अक्षरी नऊ लाख तीस हजार रूपये) मिळतील, असे सांगितले. बरेच दिवस होवूनही माझे बहिणीच्या नावे प्लॉट परत करूनही पैसे मिळत नसल्याने मी वेळोवेळी एमआयडीसी अमरावती येथील कार्यालयात श्री. ढोरे साहेब यांना भेटुन अथवा मोबाईल वरून संपर्क करत होतो, परंतु श्री. ढोरे साहेब काहीतरी कारणे सांगुन वेळ मारून नेत होते. त्यांनतर साधारण एक महिन्यापूर्वी श्री. ढोरे साहेबांनी आमचे प्लॉटचे पैसे लवकर मिळण्यासाठी तुम्हाला 25,000/- रू मला दयावे लागतील, तरच तुमचे काम लवकर करतो, नाहीतर तुमचे काम लवकर होणार नाही, असे बोलले. त्यावेळी मी ढोरे साहेबांना घाबरून जावुन नाईलाजाने माझे जवळ असलेले 5,000/- रू दिले व राहीलेले 20,000/- रू पैशाची जमवाजमव करून देतो,



पोलीस उप-अधीक्षक कार्यालय सत्यमेव जयते अँटी करप्शन ब्युरो, अमरावती

सत्यप्रत
Bjadhav
भारत एकनाथ जाधव
पोलीस निरीक्षक
अँन्टी करप्शन ब्युरो,अमरावती.

Scanned with ACE Scanner

असे बोललो. तसेच माझे वडीलांना कॅन्सर झाला असुन लवकरात लवकर प्रक्रिया पुर्ण करून आमचे पैसे दयावेत, अशी विनंती केली. परंतु मी ढोरे साहेबांना उर्वरीत 20,000/- रू. न दिल्याने अजुनपर्यंत आम्हाला आमचे पैसे मिळाले नाहीत. माझे वडीलांना कॅन्सरसारखा गंभीर आजार झाला असुन त्यावरील उपचाराकरीता मला व माझे बहिणीला पैशांची खुप गरज आहे, तसेच त्याकरीता आमचे वरील प्लॉटचे पैसे परत मिळविण्याकरीता मला एमआयडीसी, अमरावतीचे श्री. ढोरे साहेब यांना लाच देण्याची माझी मुळीच इच्छा नाही. तसेच एमआयडीसी अमरावतीचे श्री. ढोरे साहेब यांचेसोबत माझा कोणताही आर्थिक व्यवहार नाही, अथवा वादविवाद नाही. तरी त्यांचेवर अँन्टी करप्षनची योग्य ती कारवाई करण्यात यावी, ही विनंती आहे अशा आशयाची तक्रार दिली होती. मी दिलेल्या तक्रारीवर कार्यवाही करण्याकरीता पो.नि.भारत जाधव यांनी दोन सरकारी पंच यांना पत्र देवुन त्यांचे कार्यालयात बोलावुन माझा त्यांना परिचय करुन दिला व दोन्ही पंचास व मला डिजिटल व्हाईस रेकॉर्डर बद्दल माहीती सांगुन त्याची कार्यपध्दती सांगितली व प्रात्यक्षिक करुन दाखविले. त्या संदर्भाने पडताळणी पुर्व पंचनाम्याची कार्यवाही करण्यात आली. त्यानंतर आम्ही एमआयडीसी कार्यालय, अमरावती येथे गेलो असता, श्री. ढोरे हे रजेवर असल्यामुळे दिनांक 03/02/2025 रोजी पडताळणी करण्याचे सर्वानुमते ठरविण्यात आले. दिनांक 03/02/2025 रोजी मी ला.प्र.वि. कार्यालय, अमरावती येथे हजर झालो असता, कार्यालयात सापळा पथकातील सर्व अधिकारी, अंमलदार व दोन षासकीय पंच हजर होते. त्यावेळी पंचाना तसेच मला पडताळणी पुर्व पंचनाम्यातील सुचनाची उजळणी करुन दिली. त्यानंतर व्हाईस रेकॉर्डर सुरु करुन माझेजवळ दिले व पंच क्र. 1 श्री. गहाण यांचेसोबत श्री. ढोरे यांची भेट घेण्याकरीता एमआयडीसी कार्यालय, अमरावती येथे रवाना केले असता, त्यावेळी आमची भेट श्री. ढोरे सोबत झाली. भेटी दरम्यान श्री. ढोरे यांनी मला सांगीतले की, तुमच्या प्लॉटची सरेंडर व्हॅल्यु ही 9,30,000/- रुपये होत होती, परंतु मी सदर रक्कम ही वाढवुन दिली आहे. तुम्ही मला चार वाजता व्हॉटस्अप व्हाईस कॉल करा, असे सांगितले. त्यावर मी परत व्हॉटस्अप व्हाईस केला असता, त्यांनी कॉल कट केला. त्यामुळे अंदाजे चार वाजताच्या दरम्यान मला पोनि जाधव साहेब यांनी सांगितल्याप्रमाणे मी व पंच क्र. 1 श्री. गहाण यांचेसोबत पडताळणी कार्यवाही करीता एमआयडीसी कार्यालय, अमरावती येथे गेलो. त्यावेळी आमची भेट श्री. ढोरे सोबत झाली. भेटी दरम्यान श्री. ढोरे यांनी माझे कामासंबंधाने चर्चाकरून तु उदया 10- 15 मिनीटांसाठी 12.00 वा.च्या सुमारास भेटायला ये, असे बोलले.

त्याप्रमाणे दिनांक 04/02/2025 रोजी पुन्हा पोनि जाधव साहेब यांनी व्हाईस रेकॉर्डर सुरु करुन माझेजवळ दिले व पंच क्र. 1 श्री. गहाण यांचेसोबत श्री. ढोरे यांची भेट घेण्याकरीता एमआयडीसी कार्यालय, अमरावती येथे रवाना केले. त्यावेळी आमची भेट श्री. ढोरे यांचेसोबत झाली. भेटी दरम्यान श्री. ढोरे यांनी मला पडताळणी कार्यवाही दरम्यान पंचासमक्ष तडजोडीअंती 20,000/- रू. लाचेची मागणी करून केली व त्यातील पहीला टप्पा 10,000/- रू. आधी दे व उर्वरीत 10,000/- रू काम झालेवर चेक मिळाल्यावर दे, असे बोलले. तसेच यापुर्वी माझेकडुन 5,000/- रू स्विकारल्याचे ही मान्य केले. त्यावरून लागलीच सर्वानुमते श्री. ढोरे साहेब यांचेवर सापळा कार्यवाही आयोजीत करण्याचे ठरवण्यात आले. त्याकरीता पोनि जाधव साहेब यांनी मला श्री. ढोरे साहेबांना देण्यासाठी लाच रक्कम 10,000/- रू. हजर करण्यासाठी सांगितलेवरून मी माझेजवळील 10,000/- रू. रक्कमेच्या 500/- रू. दराच्या एकुण 20 नोटा हजर केल्या. त्यानंतर पोनि जाधव साहेब यांनी सविस्तर सापळापुर्व पंचनामा केला. त्यानंतर मला व पंच क्र. 1 श्री. गहाण यांना माझेजवळ व्हॉईस रेकॉर्डर सुरू करून मी श्री. ढोरे साहेब यांची भेट घेण्याकरीता एमआयडीसी कार्यालय, अमरावती येथे 16.08 वा. रवाना केले. आमच्या पाठोपाठ संपूर्ण सापळा पथक, पंच क्र. 2 यांचेसह खाजगी वाहनाने व सरकारी वाहनाने एमआयडीसी कार्यालय, अमरावती येथील परिसरात पोहचुन आजुबाजुला आडोसा घेवून थांबले. त्यावेळी मी व पंच क्र. 1 श्री. गहाण असे श्री. ढोरे साहेब बसतात, त्या ठिकाणी गेलो. त्यावेळी श्री. ढोरे साहेब यांनी मला कार्यालयातील शौचालयामध्ये बोलावले. त्यावेळी मी व पंच क्र. 1 श्री. गहाण असे दोघेही श्री. ढोरे साहेबांच्या पाठीमागे शौचालयात गेलो. तेव्हा माझे जवळील लाच रक्कम 10,000 /-रू. श्री. ढोरे साहेबांच्या हातात दिले, सदरची रक्कम श्री. ढोरे साहेबांनी स्विकारून माझे व पंच क्र. 1 श्री. गहाण यांचे समोरच त्यांचे नेसते पॅन्टचे डावे खिशात ठेवले, त्यांनतर मी व पंच क्र. 1 श्री. गहाण यांनी कार्यालयाचे बाहेर येवून सापळा पथकास लाच रक्कम स्विकारल्याचा नियोजित इशारा केला, त्यांनतर लागलीच पोनि जाधव साहेब, पोनि मांजरे साहेब व सापळा पथक त्याठिकाणी आले, माझे जवळील व्हॉईस रेकॉर्डर बंद केला, ती वेळ 16.29 वा. होती. त्यांनतर पोनि जाधव साहेब यांनी श्री. ढोरे साहेब यांना स्वतःचे ओळखपत्र दाखवुन परिचय दिला. त्यांनतर लोकसेवक श्री. ढोरे साहेबांना ताब्यात घेवून त्यांना त्यांचे नाव व पद विचारले असता त्यांनी त्यांचे नाव मोतीराम माणिकराव ढोरे, वय 42 वर्ष, पद सहाय्यक, वर्ग-3, महाराष्ट्र राज्य औदयोगिक विकास महामंडळ कार्यालय, बडनेरा रोड, अमरावती असे सांगितले. त्यांनतर श्री. ढोरे साहेब यांना पंचासमक्ष लाच रक्कमेबाबत विचारले असता त्यांनी सदरची लाच रक्कम ही त्यांचे पॅन्टचे डावे खिशात असल्याचे सांगितले. त्यावर पोनि जाधव साहेब यांचे सुचनेवरून



Scanned with ACE Scanner

पंच क्र. 1 श्री. गहाण यांनी लाच रक्कम श्री. ढोरे साहेब यांचे पॅन्टचे डावे खिशातुन बाहेर काढली. सदर लाच रक्कम तक्रारदार यांनी सापळापूर्व कार्यवाहीमध्ये सादर केलेली असल्याबाबत पंचानी खात्री केल्यानंतर नमुद 10,000/- रू. लाच रक्कम पंच क्र. 1 श्री. गहाण यांच्याकडे सुरक्षित ठेवली. त्यांनतर पोनि जाधव साहेब यांनी श्री. ढोरे साहेब यांना 17.00 वा.चे सुमारास सदर प्रकरणाचे तपासकामी ताब्यात घेवून त्याबाबत त्यांचे वरिष्ठांना श्री. ढोरे यांचेवर लाच स्विकारले प्रकरणी कारवाई झाल्याची माहिती देवून श्री. ढोरे साहेब यांना पुढील कार्यवाहीसाठी ला.प्र.वि. अमरावती घटक कार्यालय येथे शासकीय वाहनातुन घेवून आले. तरी दिनांक 04/02/2025 रोजी 16.08 ते 16.29 वा.चे दरम्यान एमआयडीसी कार्यालय, अमरावती येथील पहिल्या माळ्यावरील शौचालयात लोकसेवक श्री. मोतीराम माणिकराव ढोरे, वय 42 वर्श, पद सहाय्यक, वर्ग-3, महाराष्ट्र राज्य औदयोगिक विकास महामंडळ कार्यालय, बडनेरा रोड, अमरावती, राह. एमआयडीसी कॉलनी, रूम नं. 102, शहनाई मंगल कार्यालयाचे मागे, बडनेरा रोड, अमरावती यांनी माझी बहिण किर्ती नथ्थुजी ठाकरे हिच्या नावे नांदगाव पेठ येथे असलेला टी.एस. 12 क्रमांकाच्या प्लॉट सरेंडरची फाईल साहेबांना सांगुन मंजुरीसाठी लवकर वरिष्ठ कार्यालयाकडे पाठविण्यासाठी लाच मागणी संबंधाने केलेल्या पडताळणी कारवाई दरम्यान मला पंचासमक्ष 20,000/-रू. लाचेची मागणी करून आयोजित सापळा कारवाई दरम्यान माझेकडुन पहिला टप्पा 10,000/-रू. लाचेची रक्कम पंचासमक्ष स्विकारल्यामुळे त्यांचेवर कायदेशीर कारवाई करण्यात यावी, ही विनंती.
समक्ष ( भारत एकनाथ जाधव )पोलीस निरीक्षक अँन्टी करप्शन ब्युरो, अमरावती अशा लेखी फिर्याद वरून DO आदेशाने गुन्हा दाखल करण्यात आला.

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.** (केलेली कारवाई: बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:**
(प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):

**or** (किंवा)

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव):
amit siddheshwar bakatwar
**Rank** (पद): SI (Sub-Inspector) **No.**(क्र.): 15101000402ASB
**to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.**
(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):
**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

(Stamp: पोलीस उप-अधीक्षक कार्यालय ... सत्यमेव जयते)

(Signature) Bjadhav
भारत एकनाथ जाधव
पोलीस निरीक्षक
अँन्टी करप्शन ब्युरो,अमरावती.

Scanned with ACE Scanner